जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 FEB 2020
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे तलवारबाजी स्पर्धेत यश

## भूवनेश्वर (ओरिसा) येथील खेलो इंडिया आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा



**खेलो इंडिया आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत यश मिळविलेला शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी गुरूवारी कुलगुरू देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अनिल कुराडे आदी उपस्थित.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

भूवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजी संघाने तृतीय क्रमांक पटकावला. गुरूवारी या खेळाडूंनी कुलगुरू देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी कुलगुरू देवानंद शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सींग खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नांव लौकिक करण्याची पूर्ण क्षमता आहे. या खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेतील पहिले पदक प्राप्त करून दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे, असे गौरोवोद्गार काढले. यावेळी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ.पी.टी. गायकवाड, डॉ.अनिल कुराडे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांचे यशस्वी खेळाडूंना प्रोत्साहन लाभले.

**यशस्वी खेळाडूंची नावे :**

आदित्य अनघळ (सेबर वैयक्तीक सुवर्णपदक, सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), विपुल येडेकर (फॉइल वैयक्तीक कास्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), प्रथमकुमार शिंदे (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), धनंजय जाधव (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), गिरिष जकाते (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टिम इव्हेंट कास्यपदक), प्रतिक जाधव (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक), श्रेयस तांबवेकर (इप्पी टिम व फॉइल टिम रौप्य व कास्यपदक), मोरेश्वर पाटील (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक), गजराज डोके (इप्पी टिम इव्हेंट रौप्यपदक), प्रसाद सनस (सेबर टिम इव्हेंट रौप्यपदक).



कोल्हापूर : 'खेलो इंडिया' आंतरविद्यापीठ स्पर्धेतील विजेत्या शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग संघासमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ.पी. टी.गायकवाड आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग संघाचे खेलो इंडिया स्पर्धेत यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक करण्याची पूर्ण क्षमता आहे. खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेतील पहिले पदक प्राप्त करून देदीप्यमान यश प्राप्त केले, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

भुवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या पहिल्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग संघाने तृतीय क्रमांकांचे विजेतेपद पटकावले. संघातील खेळाडूंनी गुरुवारी कुलगुरू डॉ. शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अनिल कुराडे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे खेळाडूंना प्रोत्साहन लाभले. कोच डॉ. राहुल मगदूम, संघ व्यवस्थापक डॉ. महेश पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

**सांघिक गटातील सर्वसामान्य तृतीय क्रमांकाचे विजेतेपद पटकावलेले यशस्वी खेळाडू :** अदित्य अनघळ (सेबर वैयक्तिक सुवर्णपदक, सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), विपुल येडेकर (फॉइल वैयक्तिक कास्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कास्यपदक), प्रथमकुमार शिंदे (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कांस्यपदक), धनंजय जाधव (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), गिरिष जकाते (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कास्यपदक), प्रतीक जाधव (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), श्रेयस तांबवेकर (इप्पी टीम व फॉइल टीम रौप्य व कांस्यपदक), मोरेश्वर पाटील (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक), गजराज डोके (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक), प्रसाद सनस (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक).



पहिल्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजी (फेन्सिंग) संघाने गुरुवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली. यावेळी पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाचे तलवारबाजीत यश

## 'खेलो इंडिया' : भुवनेश्वर येथे झालेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : भुवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या पहिल्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या तलवारबाजी (फेन्सिंग) संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या संघातील खेळाडूंनी गुरुवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली.

सांघिक गटातील सर्वसामान्य तृतीय क्रमांकाचे विजेतेपद पटकाविलेल्या खेळाडूंमध्ये आदित्य अनघळ (सेबर वैयक्तिक सुवर्णपदक, सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), विपुल येडेकर (फॉइल वैयक्तिक कांस्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कांस्यपदक), प्रथमकुमार शिंदे (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कांस्यपदक), धनंजय जाधव (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), गिरीश जकाते (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक, फॉइल टीम इव्हेंट कांस्यपदक), प्रतीक जाधव (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक), श्रेयस तांबवेकर (इप्पी टीम व फॉइल टीम रौप्य व कांस्यपदक), मोरेश्वर पाटील (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक), गजराज डोके (इप्पी टीम इव्हेंट रौप्यपदक), प्रसाद सनस (सेबर टीम इव्हेंट रौप्यपदक) यांचा समावेश आहे.

या खेळाडूंना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रशिक्षक डॉ. राहुल मगदूम, संघ व्यवस्थापक डॉ. महेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

### नावलौकिक करण्याची क्षमता

विद्यापीठाच्या फेन्सिंग खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक करण्याची पूर्ण क्षमता आहे. या खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेतील पहिले पदक मिळवून देदीप्यमान यश प्राप्त केले आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. शिंदे यांनी केले. यावेळी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अनिल कुराडे उपस्थित होते.

अमित गद्रे



# विद्यापीठात घुमला माय मराठीचा जागर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

मराठी भाषा गौरव दिनाला गुरूवारी शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कलाविष्काराची जोड देत विद्यापीठाच्या आवारात मायमराठीचा जागर केला. मराठी भाषेतील शब्दांच्या गंमतीजमतीपासून, उखाणे, ओव्या, लोकगीते यातून मायमराठीचा सांगितीक उत्सव साजरा केला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभाग व मराठी भाषा अभ्यास मंडळ यांच्यावतीने विविध कार्यक्रम झाले. २६ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या लोककला महोत्सवाची सांगता गुरूवारी उत्सव माय मराठीचा या कार्यक्रमाने झाली. कार्यक्रमाचे उदघाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवाजी राऊत यांनी कॉलम ऑफ थॉटस या पुस्तकाच्या प्रती ग्रंथालयास भेट दिल्या. उदघाटन सत्राचे प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, सयाजीराव गायकवाड संदेश गावंदे आदी उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील शब्दांपासून संगीतापर्यंतचे अनेक पैलू उलगडले. ज्ञानेश मुळ्ये दिग्दर्शित रेडिओ बटाटा लघुनाटिकेचे सादरीकरण केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातर्फे रंगलेल्या लोककला महोत्सवात गायन करताना विद्यार्थी कलाकार.**

# रंगला 'मायमराठी'चा उत्सव

## मराठी भाषा दिन ; लोककला महोत्सवाचे थाटात आयोजन

कोल्हापूर, ता. २७ : अठरापगड जातींच्या मराठी मुलखाची संस्कृती अनेक कलांनी नटलेली आहे आणि हीच संस्कृती आज शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषाभवनात अवतरली. निमित्त होते मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित लोककला महोत्सवाचे. मराठी विभागाच्या वतीने हा दोनदिवसीय महोत्सव रंगला.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आज 'उत्सव माय मराठीचा' हा कार्यक्रम सादर झाला. यावेळी मराठीतील लोकप्रिय चित्रपट गीतांचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. मराठीचा उपयोग दैनंदिन कामकाजात सातत्याने होण्यासाठी आग्रह धरला पाहिजे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शिवाजी राऊत यांनी 'कॉलम ऑफ थॉटस्' या पुस्तकाच्या प्रती मराठी विभागाच्या ग्रंथालयास भेट दिल्या. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संगीत अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. नंदकुमार मोरे, शिवाजी राऊत आदी यावेळी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी यावेळी 'रेडिओ बटाटा' ही लघुनाटिका सादर केली. ज्ञानेश मुळे यांचे दिग्दर्शन तर संदेश गावंदे यांचे संगीत संयोजन होते. संजय तोडकर यांनी तांत्रिक बाजू सांभाळल्या. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

# विद्यापीठात रंगला 'माय मराठी'चा संगीत उत्सव

## मराठी राजभाषा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी..' 'कानडा राजा पंढरीचा..' अशा काव्य, गीते, गवळण, सवाल-जवाबाने विद्यापीठात माय मराठीचा संगीत उत्सव रंगला.

कवी कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यापीठाच्या वि.स.खांडेकर भाषा भवन सभागृहात 'उत्सव माय मराठीचा' हा संगीत कार्यक्रम झाला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याहस्ते उद्घाटन झाले. मराठी भाषा संवर्धनासाठी मराठी साहित्याचे वाचन, लेखन विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन केले. यावेळी शिवाजी राऊत यांनी 'कॉलम ऑफ थॉटस' या पुस्तकाच्या काही प्रती मराठी विभागाच्या ग्रंथालयास दिल्या.



**कोल्हापूर : विद्यापीठात मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित उत्सव माय मराठीचा संगीत कार्यक्रमात गीते सादर करताना विद्यार्थी.**

संगीत कार्यक्रमात मराठी संस्कृती उलगडून दाखविणाऱ्या लोकप्रिय जुन्या-नव्या मराठी चित्रपट गीतांचे सादरीकरण झाले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'रेडिओ बटाटा' ही लघुनाटिका सादर केली. नाटकाचे दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले. संगीत संयोजन संदेश गावंदे यांनी केले. तंत्रसहाय्य संजय तोडकर यांनी केले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. यावेळी संगीत अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

# रंगला शेतकरी अन् शास्त्रज्ञांत संवाद

निसर्गाच्या लहरीपणावर मात करत शेती करणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीमशेतीच्या माध्यमातून प्रगत व प्रयोगशील करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाच्यावतीने रेशीमशेतीतील आधुनिक धडे देण्यात आले. यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठ व जिल्हा रेशीम संचालनालय यांच्यावतीने निवडलेल्या यवतमाळ येथील ९० शेतकऱ्यांशी रेशीमशेतीत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांशी संवाद घडवून आणला.

शिवाजी विद्यापीठात प्राणिशास्त्र अधिविभागाच्यावतीने रेशीमशास्त्र इन्क्युबेशन सेंटर सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून ५०० शेतकऱ्यांना रेशीमशेतीचे कौशल्य विकास अंतर्गत कोशनिर्मिती गुणवत्ता व उत्पादकता प्रशिक्षण देण्यात आले आहे. यवतमाळ येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समितीच्या पुढाकाराने रेशीमशेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्यांना अर्थसाह्य केले जाते. यामध्ये सक्रिय काम करणाऱ्या शेतकऱ्यांना विद्यापीठात रेशीमशास्त्राबाबत प्रशिक्षित करण्यात आले.

यावेळी ए. डी. जाधव यांनी तुतीची लागवड व कीटक संगोपनाविषयी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी रेशीम अळ्यांचे रोग व कीड व्यवस्थापन याबाबत माहिती दिली. डॉ. एस. आर. यंकची यांनी 'एक झाड एक अंडीपूंज' ही संकल्पना व्याख्यानातून मांडली.

प्रशिक्षणांतर्गत शेतकऱ्यांनी कागल येथील तुती पाने कापणी व कोश काढणी प्रकल्पाला भेट दिली. यळगूड येथील रेशीमग्रामला भेट देऊन माहिती घेतली. रेशीमशेती क्षेत्रातील प्रयोगशील शेतकरी आप्पासाहेब झुंजार, राजेंद्र बागल, शिवाजी जगताप यांच्यासोबत यवतमाळ येथील शेतकऱ्यांनी संवाद साधला. शास्त्रज्ञांशी झालेल्या संवादात रेशीमशेती प्रकारातील संशोधन, काळानुरूप गरज, उपयुक्तता याविषयी माहिती घेतली.



शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्रविभागातर्फे रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून आयोजित रेशीमशेती कार्यशाळेत सहभागी झालेले यवतमाळ येथील शेतकरी.

# ‘स्त्रिया आजही पारंपरिक जोखडात’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘स्त्रियांनीच घर सांभाळावे. कुटुंबाच्या गरजा पूर्ण कराव्यात, या पारंपरिक मानसिकतेतून आजही समाज बाहेर पडलेला नाही. जगभरातील मोठ्या कंपन्यांच्या प्रमुख पदावर असलेल्या स्त्रियांनीही घरात पोहोचताच तिने कुटुंबाच्या गरजा पूर्ण कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. स्त्रियांवर परंपरेचे जोखड आजही कायम आहे,’

## ‘न बांधल्या जाणाऱ्या घरात’चे प्रकाशन

असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांनी केले. महावीर कॉलेजमध्ये गुरुवारी कवयित्री सुप्रिया आवारे यांच्या ‘न बांधल्या जाणाऱ्या घरात’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. आवारे यांचा हा काव्यसंग्रह गाजियाबाद (दिल्ली) येथील कॉपर कॉइन संस्थेने प्रकाशित



‘न बांधल्या जाणाऱ्या घरात’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी कवयित्री नीरजा, सुप्रिया आवारे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आर. पी. लोखंडे, प्रा. जयवंत दळवी, गोपाळ गावडे, आदी.

केला आहे. संग्रहाचे प्रकाशन नीरजा, शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, महावीर कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे आदींच्या हस्ते झाले.

कवयित्री नीरजा म्हणाल्या, ‘ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरातील मुलींना जास्त स्वातंत्र्य असते असा समज आहे. प्रत्यक्षात दोन्ही ठिकाणी स्त्रियांना अपेक्षित मोकळीक नाही. काळ बदलत असला तरी परिवर्तनाची गती खूप कमी आहे. अजूनही स्त्रियांकडे केवळ प्रजननक्षम वस्तू म्हणूनच पाहिले जाते. बाईपण सोडून माणूसपणाच्या नजरेतून स्त्रियांकडे पाहिले जात नाही. स्त्रियांनी त्यांच्या क्षेत्रात कितीही यश मिळवले तरी, घरी आल्यानंतर तिनेच कुटुंबाच्या गरज भागवाव्यात अशी इतरांची अपेक्षा असते. बाईपणाची झूल झुगारून देऊन स्वतंत्रपणे जगण्याच्या ऊर्मीतून स्त्रीवादी साहित्याचा जन्म झाला. १९८०-९० च्या दशकांपेक्षा आजचा काळ बदलला आहे. यामुळे बदलत्या काळाला भिडणारी कविता तरुण कवयित्रींकडून येत आहे. यापैकी सुप्रिया आवारे या महत्त्वाच्या कवयित्री ठरतील. त्यांची कविता नवी वाट शोधणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते.’

आवारे यांच्या कविता संग्रहाबद्दल बोलताना डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, ‘आवारे यांची कविता चिंतनशील आणि स्वतंत्र अभिव्यक्तिची आहे. या कवितांनी अनेक नव्या प्रतिमा आणि आकृतीबंध तयार केले. भवतालचा शोध घेताना व्यक्त होणारी ही कविता वास्तवाला भिडते, यामुळेच तिची शब्दकळा थेट आहे. आशय विश्वापासून ते अभिव्यक्तीपर्यंत सर्वांगाने वेगळी ठरणारी कविता मराठी साहित्यात वेगळेपण सिद्ध करणारी आहे.’

आवारे यांनी काव्यनिर्मितीमागील प्रेरणा स्पष्ट केली. समकालातील पिढीच्या दुःखातून मनातील सल कवितेच्या रुपाने बाहेर येत असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य आर. पी. लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुषमा रोटे यांनी अध्यक्षीय मनोगतातून मराठी कवितेच्या भवितव्याबद्दल आशावाद व्यक्त केला. डॉ. गोमटेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमासाठी कवी खलील मोमीन, चित्रकार संपत गायकवाड, महेश लोंढे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. गोपाळ गावडे यांनी आभार मानले.

# प्राचार्य शरद कणबरकर यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील हिंदी विषयाचे लेखक, प्राचार्य शरद कणबरकर (वय ९१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, नातवंडे असा परिवार आहे. प्राचार्य कणबरकर यांनी विकास हायस्कूल, न्यू कॉलेज, शिवाजी विद्यापीठ येथे हिंदी अध्यापनाचे काम केले.



विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख, हिंदी पाठ्य मंडळ आणि कला विद्याशाखेचे अध्यक्ष, विद्वत सभा व बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टिचिंग ॲंड रिसर्चचे सदस्य आणि एक्स्ट्रा म्यूरल बोर्डचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. सन १९४६ ते १९६७ या कालावधीत वर्धा, पुणे, मुंबई विद्यापीठाच्या हिंदी परीक्षेचे प्रचार, प्रसाराचे काम केले.

# 'डीवाय'चा उद्या पदवीदान समारंभ

म. टा. वृत्तसेवा, कसबा बावडा

डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप कोल्हापूर अंतर्गत डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी कसबा बावडा, डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदे आणि डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग साळोखेनगर या तिन्ही महाविद्यालयांचा

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सावंत प्रमुख पाहुणे**

एकत्रित पदवीदान समारंभ शनिवारी (ता.२९) दुपारी तीन वाजता हॉटेल सयाजीच्या व्हिक्टोरिया हॉलमध्ये होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्रमुख उपस्थित राहणार असल्याची माहिती डॉ. डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. एस. गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. गुप्ता म्हणाले, 'पदवीदान समारंभात तीन महाविद्यालयांमधून २०१८-१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या एकूण ८६६ विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व व्यवस्थापन शास्त्र या शाखेतून पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सन २०१८-१९ मध्ये ११ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. त्यांना 'शांताई' स्कॉलरशिप पुरस्कार म्हणून संस्थेच्या वतीने रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेस डॉ. ए. एस. गुप्ता, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या क्षमा कुलहल्ली, डॉ. सतीश पावसकर, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर कल्लीमणी, उपप्राचार्य ए एन जाधव, एल. जी. मालदे उपस्थित होते.

# संगीत कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऋतुमधील गाणी आणि गाण्यामधील ऋतू या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. २ ते ४ मार्च रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत ही कार्यशाळा लोकविकास केंद्र येथे होणार आहे. यामध्ये शिशिर व वसंत ऋतुमधील हवामानाशी संबंधित राग व त्यावर आधारलेली गाणी शिकवली जातील. कार्यशाळेस सुप्रसिध्द गायिका, संगीत व नाट्य विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली निगवेकर मार्गदर्शन करतील. इच्छुकांनी २६०९३०९ या क्रमांकावर ११ ते ५ वेळेत संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 FEB 2020
तरुण भारत

# राष्ट्रप्रगतीत जनसमुदायास सामावून घेणे काळाची गरज

## जिल्हाधिकारी दौलत देसाई: राजाराम महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा संपन्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्येकाने सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना संवेदनशील, सकारात्मक असणे आवश्यक आहे. प्रशासनात काम करताना जनसमुदायास नेतृत्व देऊन त्यांना राष्ट्राच्या प्रगतीत समाविष्ट करून घेणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले. राजाराम महाविद्यालयामध्ये गुरुवारी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. गजानन पळसे प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमनर होते.



कोल्हापूर : राजाराम महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा गुरुवारी संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

जिल्हा प्रशासन विद्यापीठाच्या सहाय्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाशी निगडित प्रश्नाचे अनुभव मिळवून देण्यासाठी योजना राबविणार असल्याचे दौलत देसाई यांनी सांगितले.

डॉ. गजानन पळसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पदवी स्वीकारल्यानंतर पदवीचे पावित्र्य सांभाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी आपल्या शिक्षणाचा समाज उद्धारासाठी उपयोग करावा. आपले कौशल्य विकसित करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे.

डॉ. अण्णासाहेब खेमनर यांनी आभार मानले. महाविद्यालयातील बीएच्या १२५, बीएसीच्या ३५० विद्यार्थ्यांना पदवीचे वितरण करण्यात आले. तसेच १२ विद्यार्थ्यांना एमफिल व पीएचडी पदवीचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. एच. एन. कठरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर.ए. कडाकणे यांनी तर आभार प्रदर्शन अनिता बोडके यांनी केले.

# विद्यापीठाच्या पत्रकारिता अध्यासनाचे डॉ. शिवाजी जाधव समन्वयक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांची विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली.

विद्यापीठात २०१७ पासून पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन सुरू आहे. या अध्यासनाच्या वतीने पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम हा एक वर्षाचा अभ्यासक्रम सुरु आहे. अध्यासनात अध्यापन व संशोधनाचे काम करण्यात येत आहे. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी या अध्यासनाची जबाबदारी डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे सोपविली आहे. याकामी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींचे मार्गदर्शन लाभले. डॉ. जाधव यांना पत्रकारितेत विविध पदांवर काम केल्याचा सोळा वर्षांचा अनुभव आहे. शिवाय त्यांची विविध विषयांवर बारा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

# 'डॉ. डी. वाय. ग्रुप'च्या अभियांत्रिकी महाविद्यालयांचा उद्या दीक्षान्त समारंभ


**कसबा बावडा : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप कोल्हापूर अंतर्गत तिन्ही अभियांत्रिकी महाविद्यालयांचा एकत्रित पदवीदान समारंभ शनिवारी (दि. २९) दुपारी ३ वा. हॉटेल सयाजी येथे आयोजित केला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार असल्याची माहिती ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. एस. गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. संजय डी. पाटील, पालकमंत्री सतेज डी. पाटील, आ. ऋतुराज पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

# ‘डायबीटीस’च्या रुग्णांना गोड दिलासा!

## शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापिकेचे संशोधन ; पेटंटसाठी प्रस्ताव दाखल



राष्ट्रीय विज्ञानदिन विशेष

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

डायबीटीस झालेल्या रुग्णांसाठी बाजारात उपलब्ध काही औषधांमुळे शरीरावर परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे. शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी संशोधन करून मेथीच्या बियांपासून मिळालेल्या ट्रायगोनेलिनपासून नॅनो पार्टिकल तयार केले. याच्या पेटंटसाठी प्रस्ताव दाखल केला आहे. त्यामुळे डायबीटीसच्या रुग्णांसाठी ही गोड दिलासादायक बातमी ठरणार आहे.

सध्याच्या धकाधकीच्या युगात बदलती जीवनशैली, जंकफूड, तणावामुळे हृदयरोग, डायबीटीसह अन्य आजार वाढत चालले आहेत. या रोगांवर औषधे उपलब्ध असली तरीदेखील रुग्णांसाठी संपूर्ण अशी उपचार पद्धती नसल्याचे दिसते. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन असून ‘वूमेन इन सायन्स’ अशी या वर्षाची थीम आहे. विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. वाळवेकर गेली १५ वर्षे वेगवेगळ्या वनस्पतींपासून पान २ वर ▸



“नैसर्गिक पद्धतीने पिकविलेल्या फळे, भाज्यांचा वापर करावा. जेणेकरून डायबीटीससह अन्य आजार होणार नाहीत. विद्यापीठातील प्रयोगशाळेत कुरकुमिन व ट्रायगोनेलिनचे नॅनो पार्टिकल्स बनविण्यात आले आहेत. याचा उपयोग डायबीटीस आणि वार्धक्य रोखण्यासाठी नक्कीच होईल.

**- डॉ. माधुरी वाळवेकर,**
सहायक प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ

# ‘डायबेटिस’च्या रुग्णांना गोड दिलासा!

**(पान १ वरून)** नॅनोपार्टीकल तयार करीत आहेत. त्याचा उपयोग करुन डायबेटिस आणि वार्धक्य यावर संशोधन करीत आहेत.

रक्तातील साखर यकृत व स्नायूतील पेशी शोषून घेण्यासाठी इन्सुलिन लागते. डायबेटिसमध्ये इन्सुलिनचे प्रमाण कमी होते. पेशीमधील साखर शोषून घेण्यासाठी लागणारे सिग्नलिंगही कमी होते. यासंदर्भात सिग्नलिंग कार्यपद्धतीवर नॅनो ट्रायगोनेलिन हे बनविले असून त्यावर संशोधन सुरु केले आहे. तसेच वयोमानानुसार मनुष्याच्या शरीरात

थांबवू शकत नाही परंतु ते लांबवू शकतो. जगभरात यावर विविध वनस्पतींच्या उपयोगाच्या माध्यमातून संशोधन कार्य सुरु आहे. यात हळद, मेथी, अश्वगंधा, ब्राम्ही अशा वनस्पतींचा समावेश आहे.

विद्यापीठातील प्रयोगशाळेत हळद, वेलदोडे, हळीव, मेथी, तुळस बिया यांचा आर्क काढून त्याचा संशोधनात्मक प्रयोग पांढऱ्या उंदरांवर केला आहे. मेथीच्या बिया डायबेटिस व वार्धक्यासाठी अधिक गुणकारी असल्याचे निदर्शनास आले आहे. हळदीला पिवळा रंग आणणारा घटक कुरकुमिन व मेथी ट्रायगोनेलिन या घटकांचा परिणाम दिसून आला आहे. हे पदार्थ खाल्यावर खूप कमी वेळ आपल्या शरीरात राहतात, त्याचे प्रमाण खूप कमी आहे. तो वाढविण्यासाठी कुरकुमिन व ट्रायगोनेलिनचे नॅनो पार्टीकल्स बनविण्यात आले. नॅनो कुरकुमिन हा वार्धक्य (एजिंग) लांबविण्यासाठी तर नॅनो ट्रायगोनेलिन हा डायबेटिसमध्ये शरीरातील स्वादुपिंडातील पेशी वाढविण्यासाठी उपयोगी असल्याचे दिसून आले आहे.

# रेशीम शेतीसंदर्भात शेतकरी-शास्त्रज्ञांमध्ये संवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात यवतमाळ जिल्ह्यातील ९० निवडक रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी भेट दिली. याप्रसंगी शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात संवाद झाला.

जिल्हा रेशीम संचलनालयाच्या वतीने या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात रेशीमशास्त्र इन्क्युबेशन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. २०१९ पासून सुमारे पाचशेपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी भेट देऊन रेशीम शेती, कोषनिर्मिती, गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले. विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने, केंद्र समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी यळगूड येथील रेशीमग्रामला भेट दिली.

# शिवाजी विद्यापीठात आज वैज्ञानिक मॉडेलचे प्रात्यक्षिक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाच्या अनुषंगाने दि. २८ रोजी नॅनो सायन्स विभागामध्ये विविध वैज्ञानिक मॉडेलचे प्रात्यक्षिक भरविण्यात येणार आहे.

हे प्रदर्शन शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी १२ ते ४ यावेळेत खुले राहणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विज्ञान व तंत्रज्ञानचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

# वारणा महाविद्यालयात उद्यापासून मराठा इतिहास व्याख्यानमालेचे आयोजन

**वारणानगर (पुढारी वृत्तसेवा) :**

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने, शिवजयंतीनिमित्त 'मराठा इतिहास व्याख्यानमाला' शनिवारी (दि. २९) सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या विनय कोरे क्रीडा व सांस्कृतिक विकास केंद्रामध्ये आयोजित केली आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आ. विनय कोरे भूषविणार आहेत. तर प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. 'मराठ्यांचा मध्ययुगीन इतिहास' या विषयावर डॉ. आय. एच. पठाण विचार व्यक्त करणार आहेत. शाहीर रंगराव पाटील व सहकारी यांचा 'शिवशाही ते लोकशाही' हा पोवाडा सादर करणार आहेत. तरी इतिहासप्रेमी आणि भाषाप्रेमी रसिकांनी कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, डॉ. सर्जेराव जाधव यांनी केले आहे.

# 'मराठी भाषा माझी.. मी मराठी भाषेचा'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी राज भाषा दिनाचे औचित्य साधून शिवसेनेच्या वतीने बिंदू चौक येथे ग्रंथाचे पूजन करून मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी मराठी भाषा माझी, मी मराठी भाषेचा अशी शपथ घेण्यात आली. महापौर सौ. निलोफर आजरेकर यांच्या हस्ते ग्रंथाचे पूजन करण्यात आले.

यावेळी मराठी भाषेत लिहिणार, मराठी भाषा वाचणार, मराठी भाषा बोलणार, मराठी भाषेच्या प्रचारासाठी प्रयत्नशील राहणार, या भाषेच्या संगोपनासाठी व संवर्धनासाठी कार्य करणार, मराठी भाषेच्या संस्कृतीची जोपासना करणार, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देण्यासाठी आग्रही राहणार, अशी शपथ घेण्यात आली.

यावेळी तुकाराम महाराजांची गाथा सामान्य लोकांना समजावी यासाठी शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम यांच्या गाथेचे निरूपण व त्याचे वर्गीकरण दोन खंडांत केल्याबद्दल मारुतीराव जाधव यांचा महापौरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे, शिवाजीराव जाधव, अवधूत साळोखे, राजू यादव, विराज पाटील, मंजित माने, दिलीप देसाई, सौ. शुभांगी पोवार व शिवसैनिक उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या फेन्सिंग संघाचे यश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या फेन्सिंग संघाच्या खेळाडूंनी भुवनेश्वर येथे झालेल्या पहिल्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. फेन्सिंग संघातील खेळाडूंनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रशिक्षक डॉ. राहुल मगदूम, संघ व्यवस्थापक डॉ. महेश पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अनिल कुराडे उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंची नावे : आदित्य अनघळ, विपुल येडेकर, प्रथमकुमार शिंदे, धनंजय जाधव, गिरीश जकाते, प्रतीक जाधव, श्रेयस तांबवेकर, मोरेश्वर पाटील, गजराज डोके, प्रसाद सणस.

# विज्ञान सप्ताहातून नवसंकल्पनांवर भर

## राष्ट्रीय विज्ञान दिन : वैज्ञानिक मॉडेल्सची प्रात्यक्षिकेही

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : विद्यार्थ्यांतील विज्ञानविषयक जाणिवा अधिक समृध्द व्हाव्यात, या उद्देशाने आता केवळ विद्यापीठीय पातळीवर नव्हे तर अगदी 'केजी टू पीजी' प्रयत्न सुरू झाले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विज्ञान सप्ताहांचे आयोजनाचा ट्रेंड वाढला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नवनवीन प्रयोग स्वतः करावेत आणि त्यातून नवसंकल्पना पुढे याव्यात, यासाठी प्रयत्न होऊ लागले आहेत.

शासनाच्या विज्ञान प्रदर्शनांबरोबरच आता शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि विद्यार्थ्यांनी स्वतः वैज्ञानिक उपकरणे तयार करावीत, यासाठी उपकरणांच्या स्पर्धांही होवू लागल्या आहेत. अशा स्पर्धांत विजेत्या ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटे कलाम ॲवार्ड, बालवैज्ञानिक पुरस्कार आदी पारितोषिकांनी गौरविले जाणार आहे.

पोस्टल कॉलनीतील आनंदी बालभवन या शाळेने तर पद्मश्री अरविंद गुप्ता यांनी मुलांसाठी खास तयार केलेल्या आवाजाच्या खेळण्यांची दुनिया बालमित्रांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

पाचगाव पोस्टल कॉलनी येथील या शाळेत सकाळी साडेअकरा ते सात या वेळेत मुलांना ती पहाता येणार आहेत. महापालिका शाळाही अशा उपक्रमांत आघाडीवर असून अनेक शाळांत वैज्ञानिक उपकरणांची प्रदर्शने होणार आहेत.

### 'नॅनोसायन्स'तर्फे मॉडेलची प्रात्यक्षिके

शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स विभागातर्फे विविध वैज्ञानिक मॉडेल्सची प्रात्यक्षिके अनुभवता येणार आहेत. प्रदर्शन सर्व शाळा व महाविद्यालयातील मुलांसाठी दुपारी बारा ते चार या वेळेत पाहण्यासाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शनाचा लाभ आवर्जून घ्यावा, असे आवाहन विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील यांनी केले आहे.